# उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (UPS) इयत्ता 7 वी, एप्रिल – 2026

**बैठक क्र.** | | | | | | | | | | | |

**0 1 1 1**

**पेपर क्र. - I**

**वेळ : 11:00 ते 12:30**

## माध्यम : मराठी

**संच A**

## प्रथम भाषा व गणित

**एकूण गुण : 150** **पृष्ठ : 32**

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **1** ते **25** व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **26** ते **75** असे एकूण **75** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमागत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तूळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा. उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.
प्रश्न क्र. **6** ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील. ✓ ② ⊙ ④

(6) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करावा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

## विभाग - I

### मराठी

**01.** पुढीलपैकी सजातीय स्वरांची जोडी कोणती नाही?

(1) इ - ई　　(2) अ - आ

(3) ए - ऐ　　(4) उ - ऊ

**02.** संधी नियमानुसार विसंगत जोडशब्द ओळखा :

(1) निष्फळ　　(2) षडानन

(3) निष्कारण　　(4) दुष्कर

**03.** पुढीलपैकी कोणत्या वाक्यात संयुक्त क्रियापद आहे?

(1) शेतकरी शेतात राबत असतो.

(2) राधा शेंगदाण्याच्या चिक्कीचे पाकीट घेऊन आली.

(3) वाटेत एक भेळेचे दुकान होते.

(4) दधीची ऋषींचे मानसिक सामर्थ्यही तेवढेच मोठे आहे.

**04.** 'पाठ्यपुस्तकांखेरीज अवांतर पुस्तकांचे वाचन करावे.'

या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

(1) केवलप्रयोगी अव्यय

(2) शब्दयोगी अव्यय

(3) क्रियाविशेषण अव्यय

(4) उभयान्वयी अव्यय

**05.** पुढीलपैकी स्त्रीलिंगी नाम कोणते?

(1) थाप　　(2) माप

(3) पाप　　(4) चाप

**कच्च्या कामासाठी फक्त**

**06.** वचनप्रकारानुसार विसंगत नाम ओळखा.

(1) प्रार्थना

(2) घटना

(3) सामना

(4) भावना

**07.** पुढीलपैकी सप्तमी विभक्तीचे प्रत्यय कोणते?

(1) ऊन, हून

(2) स, ला, ते, ना

(3) चा, ची, चे, च्या

(4) त, ई, आ

**08.** 'स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी बलिदान दिले होते.' या वाक्यातील अधोरेखित शब्दांची विभक्ती ओळखा.

(1) प्रथमा

(2) तृतीया

(3) चतुर्थी

(4) द्‌वितीया

**09.** 'आम्ही सहलीला गेलो' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) कर्मणी

(2) सकर्मक कर्तरी

(3) अकर्मक कर्तरी

(4) अकर्मक भावे

**कच्च्या कामासाठी फक्त**

10. पुढीलपैकी कोणत्या वाक्यात अर्धविराम वापरावे लागेल?
(1) मी तुला भेटलो की तुझे काम करेन.
(2) बैल गेला नि झोपा केला.
(3) खूप धावपळ केली परंतु गाडी चुकलीच.
(4) चांगले पीक यावे म्हणून त्याने खूप मेहनत केली.

11. 'जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला.' या वाक्याचा वाक्यप्रकार ओळखा.
(1) केवल
(2) आज्ञार्थी
(3) संयुक्त
(4) मिश्र

12. 'सगेसोयरे स्वयंपाकघरात विराजमान झाले आहेत!'
या वाक्याचा काळ ओळखा.
(1) साधा वर्तमानकाळ
(2) पूर्ण वर्तमानकाळ
(3) अपूर्ण वर्तमानकाळ
(4) रीती वर्तमानकाळ

13. 'चिंतामण त्र्यंबक खानोलकर' यांचे टोपणनाव कोणते?
(1) आरतीप्रभू
(2) चारूता सागर
(3) अज्ञातवासी
(4) अनिल

| कच्च्या कामासाठी फक्त |
| --- |
| |

**प्रश्न क्र. 14 ते 16 साठी सूचना : खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे पर्यायांतून निवडा.**

उभे भवंती प्रासाद गगनभेदी
पथी लोकांची होय दाट गर्दी
प्रभा दीपांची फुले अंतराळी
दौलतीची नित चालते दिवाळी

कोपऱ्याशी गुणगुणत अन अभंग
उभा केव्हाचा एक तो अपंग
भोंवतीचा अंधार जो निमाला
हृदयी त्याच्या जणू जात आश्रयाला

जीभ झालेली ओरडून शोष
चार दिवसांचा त्यातही उपास
नयन थिजले थरथरती हात पाय
रूप दैन्याचे उभे मूर्त काय

कींव यावी पण तयाची कुणाला
जात उपहासुनि पसरल्या कराला
तोचि येई कुणि परतुनी मजूर
बघुनि दीना त्या उधाणून ऊर

म्हणे राहीन दिन मी एक उपाशी
परी लाभू दे दोन घास यासी
खिसा ओतूनी तया ओंजळीत
चालु लागे तो दीनबंधू वाट

**14.** दीनबंधू कोणास म्हटले आहे?

(1) अपंगाला (2) मजूराला

(3) दौलतीला (4) गरीबाला

**15.** अपंगाच्या आश्रयाला कोण जात आहे, असे कवीला वाटते?

(1) दीनबंधू (2) अपंग

(3) हृदय (4) अंधार

कच्च्या कामासाठी फक्त

16. 'गरीब' या शब्दाचा समानार्थी शब्द कवितेत कोणता आला आहे?

(1) दीन (2) अपंग

(3) दैन्य (4) दिन

**प्रश्न क्र. 17 ते 19 साठी सूचना : रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून सुसंगत वाक्यांचा परिच्छेद तयार करा.**

17. .............................. दिवस संपत आले होते.

(1) पेरणीचे (2) उन्हाळ्याचे

(3) सुगीचे (4) पानगळीचे

18. सारे .............................................

(1) शेतकरी सुखावले होते.

(2) वृक्ष निष्पर्ण झाले होते.

(3) उकाड्याने हैराण झाले होते.

(4) शेतकरी पेरणी करत होते.

19. थोड्याच दिवसांनी ऋतूराजाच्या आगमनाने निसर्गात .............................. निर्माण होईल.

(1) अभिरूची

(2) तेजस्वीता

(3) चैतन्य

(4) उदासीनता

20. पुढीलपैकी वेगळ्या अर्थाचा शब्द असलेला पर्याय निवडा.

(1) दिव्य (2) प्रचंड

(3) भव्य (4) विशाल

21. पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा.

(1) किटक (2) कौतूक

(3) भिषण (4) मृत्युंजय

**कच्च्या कामासाठी फक्त**

**22.** आलंकारिक शब्द व त्याचा अर्थ यातील चुकीच्या अर्थाचा पर्याय निवडा.

(1) कोल्हेकुई – क्षुद्र लोकांची बडबड.

(2) खुशाल चेंडू – चैनखोर मनुष्य.

(3) पांढरा कावळा – अतिशय शांत वृत्तीचा.

(4) बादरायण संबंध – बळेच दाखविलेला संबंध.

**23.** 'क्षुधाक्रांत' या शब्दाचा योग्य अर्थ कोणता?

(1) तहानेने व्याकूळ झालेला.

(2) भुकेने व्याकूळ झालेला.

(3) जेवून तृप्त झालेला.

(4) आजाराने त्रस्त झालेला.

**24.** 'अवसान गोळा होणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा.

(1) बरे न वाटणे.

(2) अपेक्षाभंग होणे.

(3) शक्ती एकवटणे.

(4) खूप भीती वाटणे.

**25.** '.............................. पोट भरत नाही' अपूर्ण म्हण पूर्ण करा.

(1) अपुरे जेवून

(2) पाणी पिऊन

(3) कान कोरून


(4) दात कोरून

**कच्च्या कामासाठी फक्त**

## SECTION - II

## MATHEMATICS

**26.** In the given figure of regular hexagon, what is the addition of all its interior angles?



(1) $360^\circ$  (2) $540^\circ$

(3) $640^\circ$  (4) $720^\circ$

**27.** A rope of length 720 metres is cut at 8 places at equal distance. What is the length of each piece in decimetre?

(1) 720 decimetre  (2) 80 decimetre

(3) 800 decimetre  (4) 900 decimetre

**28.** $8\frac{1}{8}$ Km = _______________metre

(1) 812500  (2) 81250

(3) 812.5  (4) 8125

**29.** If the area of a square is 729 sq.cm. then what is its perimeter?

(1) 104 cm  (2) 108 cm

(3) 112 cm  (4) 116 cm

**30.** The diameter of a circular garden is 700 metres. The garden is to be fenced with 5 rounds of wire. Find the total cost of fencing, if the rate of the wire is 60 ₹ per metre

(1) 660000 ₹  (2) 924000 ₹


(3) 880000 ₹  (4) 760000 ₹

**SPACE FOR ROUGH WORK**

## विभाग - II

### गणित

**26.** सोबतच्या आकृतीवरून सुसम षट्कोनी बहुभुजाकृतीच्या सर्व आंतरकोनांच्या मापांची एकूण बेरीज किती?



(1) $360^\circ$ (2) $540^\circ$

(3) $640^\circ$ (4) $720^\circ$

**27.** 720 मीटर लांबीची दोरी समान अंतरावर 8 ठिकाणी कापली तर प्रत्येक तुकड्यांची लांबी डेसिमीटरमध्ये किती येईल?

(1) 720 डेसिमीटर (2) 80 डेसिमीटर

(3) 800 डेसिमीटर (4) 900 डेसिमीटर

**28.** $8\frac{1}{8}$ किमी. = ______________ मीटर

(1) 812500 (2) 81250

(3) 812.5 (4) 8125

**29.** एका चौरसाचे क्षेत्रफळ 729 चौसेमी. आहे तर त्या चौरसाची परिमिती किती?

(1) 104 सेमी. (2) 108 सेमी.

(3) 112 सेमी. (4) 116 सेमी.

**30.** एका वर्तुळाकृती बागेचा व्यास 700 मीटर असून या बागेभोवती 5 पदरी काटेरी तारेचे कुंपण करावयाचे आहे. जर तारेचा दर प्रति मीटर 60 रुपये असेल तर कुंपणासाठी एकूण खर्च किती येईल?

(1) 660000 रु. (2) 924000 रु.

(3) 880000 रु. (4) 760000 रु.

**कच्च्या कामासाठी फक्त**

31. One square is formed with a 88 cm. long wire. One circle is formed with a 88 cm. long wire. What is the difference between the area of this square and this circle?

(1) 189 sq.cm. (2) 132 sq.cm.

(3) 188 sq.cm. (4) 197 sq.cm.

32. A rectangular garden with length 60 metre and breadth 40 metre has a road with breadth $3\frac{1}{2}$ metre on the outer side along the sides of the garden. What is the area of that road?

(1) 849 sq.m. (2) 729 sq.m.

(3) 649 sq.m. (4) 749 sq.m.

33. The surface area of a cube is 294 sq.cm. What is its volume?

(1) 343 c.c.

(2) 243 c.c.

(3) 512 c.c.

(4) 443 c.c.

34. The soil from the pit with length 250 metres, breadth 150 metres and depth 2 metres is spread evenly on the road with length 7.5 km. and 20 metres breadth. What will be the thickness of the soil spread on the road?

(1) 0.4 metre (2) 0.6 metre

(3) 0.5 metre (4) 1 metre

35. The scores 623, 616, 618, 620, 617, 619, 622, 621, $x$ are given. The average of all these scores is 620. What is the value of $x$ ?

(1) 615 (2) 614

(3) 626 (4) 624

**SPACE FOR ROUGH WORK**

**31.** 88 सेमी. लांबी असलेल्या एका तारेपासून एक चौरस तयार केला आणि दुसऱ्या 88 सेमी. लांबी असलेल्या तारेपासून एक वर्तुळ बनविले तर वर्तुळ आणि चौरसाच्या क्षेत्रफळामधील फरक किती असेल?

(1) 189 चौसेमी. (2) 132 चौसेमी.

(3) 188 चौसेमी. (4) 197 चौसेमी.

**32.** 60 मीटर लांबी व 40 मीटर रूंदी असलेल्या आयताकृती बागेच्या बाहेरील बाजूला लागून $3\frac{1}{2}$ मीटर रूंदीचा रस्ता तयार केला तर रस्त्याचे क्षेत्रफळ किती चौमी. येईल?

(1) 849 चौमी. (2) 729 चौमी.

(3) 649 चौमी. (4) 749 चौमी.

**33.** एका घनाचे एकूण पृष्ठफळ 294 चौसेमी. आहे तर त्या घनाचे घनफळ किती?

(1) 343 घसेमी.

(2) 243 घसेमी.

(3) 512 घसेमी.

(4) 443 घसेमी.

**34.** 250 मीटर लांब; 150 मीटर रूंद व 2 मीटर खोल खड्ड्यातील माती 7.5 किमी. लांब, 20 मीटर रूंद रस्त्यावर पसरली तर किती मीटर जाडीचा मातीचा थर तयार होईल?

(1) 0.4 मीटर (2) 0.6 मीटर

(3) 0.5 मीटर (4) 1 मीटर


**35.** 623, 616, 618, 620, 617, 619, 622, 621, $x$, या सर्व प्राप्तांकांचे मध्यमान 620 आहे तर $x$ ची किंमत किती?

(1) 615 (2) 614

(3) 626 (4) 624

**कच्च्या कामासाठी फक्त**

**Instructions for the Question No. 36 and 37 :** This joint bar graph shows the information of fruit plants and flowering plants planted in the garden by students of $8^{th}$, $9^{th}$ and $10^{th}$ standard of a school. Observe the bar graph and answer the questions given below.





**36.** Total how many fruit plants are planted by $8^{th}$, $9^{th}$ and $10^{th}$ standard students?

(1) 255 (2) 245

(3) 225 (4) 215

**SPACE FOR ROUGH WORK**

**प्रश्न क्र. 36 व 37 साठी सूचना :** आलेखाच्या सहाय्याने पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.
एका शाळेतील इ.8वी, इ.9 वी आणि इ.10 वी तील सर्व विद्यार्थ्यांनी बागेत लावलेल्या फुलझाडांचा आणि फळझाडांचा आलेख जोडस्तंभाने दाखविलेला आहे त्यावरून प्र. क्र. 36 व 37 या प्रश्नांची उत्तरे लिहा.




**36.** इ. 8वी; इ. 9वी; इ. 10वी तील सर्व विद्यार्थ्यांनी एकूण किती फळझाडे लावली?

(1) 255
(2) 245
(3) 225
(4) 215

**कच्च्या कामासाठी फक्त**

**37.** What is the ratio of total flowering plants with the total fruit plants planted by all the students?

(1) 19:17 (2) 17:15

(3) 17:16 (4) 16:19

**38.** If 20% of $x$ = 10% of 8000 then what is the value of $x$?

(1) 4000 (2) 2000

(3) 3000 (4) 5000

**39.** The cost of sugar is increased by 25% and the sale of sugar is decreased by 10% The trade will show increase or decrease by how much percent?

(1) 15% increase

(2) 15% decrease

(3) 12.5% increase

(4) 12.5% decrease

**40.** Suresh took a loan of 10,000 at the rate of 12 p.c.p.a. and 12,000 at 9 p.c.p.a. respectively from a bank. If he repaid all the loan with interest after 3 years then find the total amount he paid?

(1) 6840 ₹

(2) 28840 ₹

(3) 27800 ₹

(4) 27880 ₹

**41.** What is the difference between the simple interest on ₹ 16,000 at the rate of $12\frac{1}{2}$ p.c.p.a. for $2\frac{1}{4}$ years and on ₹ 16,000 at the rate of 10 p.c.p.a. for $2\frac{1}{2}$ years?

(1) 500 ₹ (2) 400 ₹

(3) 550 ₹ (4) 450 ₹

**SPACE FOR ROUGH WORK**

**37.** सर्व विद्यार्थ्यांनी लावलेल्या एकूण फूलझाडांचे एकूण फळझाडांशी गुणोत्तर किती?

(1) 19 : 17 (2) 17 : 15

(3) 17 : 16 (4) 16 : 19

**38.** $x$ चे 20% = 8000 चे 10% तर $x$ = किती?

(1) 4000 (2) 2000

(3) 3000 (4) 5000

**39.** साखरेची किंमत शे. 25 ने वाढल्यामुळे साखरेचा खप शे. 10 ने कमी झाला तर उत्पन्नात शेकडा वाढ किंवा शे. घट किती झाली?

(1) 15% वाढ

(2) 15% घट

(3) 12.5% वाढ

(4) 12.5% घट

**40.** सुरेशने दोन बँकांकडून अनुक्रमे द.सा.द.शे. 12 दराने 10000 रु. आणि द.सा.द.शे. 9 दराने 12000 रुपये कर्ज घेतले. त्याने ते सर्व कर्ज 3 वर्षानंतर व्याजासह परत केले तर त्याने दोन्ही बँकांमध्ये एकूण किती रुपये भरले?

(1) 6840 रु.

(2) 28840 रु.

(3) 27800 रु.

(4) 27880 रु.

**41.** द.सा.द.शे. $12\frac{1}{2}$ दराने 16000 रु. मुद्दलाचे $2\frac{1}{4}$ वर्षाचे सरळव्याज व द.सा.द.शे. 10 दराने 16000 रु. मुद्दलाचे $2\frac{1}{2}$ वर्षाचे होणारे सरळव्याज यातील फरक किती?

(1) 500 रु. (2) 400 रु.

(3) 550 रु. (4) 450 रु.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**42.** If the item is sold for ₹ 60, the loss incurred is four times the profit gained by selling the same item at ₹ 80 then what is the cost price of that item?

(1) 62 ₹

(2) 58 ₹

(3) 56 ₹

(4) 64 ₹

**43.** When a shopkeeper sold the mobile at ₹ 39711 whose marked price was ₹ 42700 then how much % discount did he give?

(1) 9%

(2) 8%

(3) 7%

(4) 6%

**44.** Ramrao purchased a tractor at ₹ 650000 through a commission agent. If $1\frac{1}{2}\%$ of commission is paid to the agent then what is the total amount paid by Ramrao?

(1) 659750 ₹

(2) 658750 ₹

(3) 660750 ₹

(4) 661750 ₹

**45.** If $x = 37$ and $y = 27$ then $xy = ?$

(1) 949

(2) 999

(3) 989

(4) 1199

**SPACE FOR ROUGH WORK**

**42.** एक वस्तू 60 रुपयांस विकल्यामुळे जितका तोटा होतो. त्याच्या चौप्पट नफा ती वस्तू 80 रुपयांस विकल्यामुळे होतो. तर वस्तूची खरेदी किंमत किती?

(1) 62 रु.

(2) 58 रु.

(3) 56 रु.

(4) 64 रु.

**43.** एका दुकानदाराने 42700 रुपये किंमतीचा मोबाईल 39711 रुपयांस विकला तर दुकानदाराने किती टक्के सूट दिली?

(1) 9%

(2) 8%

(3) 7%

(4) 6%

**44.** रामरावांनी एक ट्रॅक्टर दलालामार्फत 650000 रुपयांना विकत घेतला दलालास $1\frac{1}{2}$% दलाली दिली तर त्याना तो ट्रॅक्टर किती रुपयांस मिळाला?

(1) 659750 रु.

(2) 658750 रु.

(3) 660750 रु.

(4) 661750 रु.

**45.** जर $x$ = 37 आणि y = 27 तर $x$y = किती?

(1) 949

(2) 999

(3) 989

(4) 1199

**कच्च्या कामासाठी फक्त**

**46.** $(x + 7)(x - 7)$ are factors of which of the following algebraic expression?

(1) $x^2-16x-63$

(2) $x^2+2x-63$

(3) $x^2-14x-63$

(4) $x^2-49$

**47.** $x^2 - 4xy + 4y^2 = ?$

(1) $(x-2y)(x-2y)$

(2) $(x+y)(x-4y)$

(3) $(x+2y)(x-2y)$

(4) $(x-y)(x-4y)$

**48.** Find the expansion of $(6x - 5y)^2$ from the following.

(1) $36x^2-30xy+25y^2$

(2) $36x^2+30xy+25y^2$

(3) $36x^2-60xy+25y^2$

(4) $36x^2-120xy+25y^2$

**49.** $(3x+4y)^2 + (3x-4y)^2 = ?$

(1) $32xy$

(2) $9x^2 + 16y^2$

(3) $9x^2 - 16y^2$

(4) $18x^2 + 32y^2$

**SPACE FOR ROUGH WORK**

**46.** $(x + 7)\ (x - 7)$ हे अवयव कोणत्या राशीचे आहेत?

(1) $x^2 - 16x - 63$

(2) $x^2 + 2x - 63$

(3) $x^2 - 14x - 63$

(4) $x^2 - 49$

**47.** $x^2 - 4xy + 4y^2$ = किती?

(1) $(x-2y)\ (x-2y)$

(2) $(x+y)\ (x-4y)$

(3) $(x+2y)\ (x-2y)$

(4) $(x-y)\ (x-4y)$

**48.** $(6x - 5y)^2$ या द्वीपदीचा वर्गविस्तार कोणता?

(1) $36x^2 - 30xy + 25y^2$

(2) $36x^2 + 30xy + 25y^2$

(3) $36x^2 - 60xy + 25y^2$

(4) $36x^2 - 120xy + 25y^2$

**49.** $(3x+4y)^2 + (3x-4y)^2$ = किती?

(1) $32xy$

(2) $9x^2 + 16y^2$

(3) $9x^2 - 16y^2$

(4) $18x^2 + 32y^2$

**कच्च्या कामासाठी फक्त**

**50.** $9a^2 - \frac{1}{16}b^2 = ?$

(1) $\left(3a - \frac{1}{4}b\right)\left(3a - \frac{1}{4}b\right)$

(2) $\left(3a + \frac{1}{4}b\right)\left(3a - \frac{1}{4}b\right)$

(3) $(3a + 4b)(3a - 4b)$

(4) $\left(9a + \frac{1}{4}b\right)\left(9a - \frac{1}{4}b\right)$

**51.** If $\frac{4x + 10}{5} = 6$ then $x = ?$

(1) 2 (2) 10
(3) 4 (4) 5

**52.** If thrice a certain number is added to twice the same number then it comes to 85 then which is that number?

(1) 23 (2) 17
(3) 27 (4) 29

**53.** What is the addition of odd numbers from 1 to 100?

(1) 1600 (2) 1800
(3) 2401 (4) 2500

**54.** What is the difference between smallest natural number and greatest negative integer?

(1) 0 (2) 1
(3) 2 (4) 4

**SPACE FOR ROUGH WORK**

**50.** $9a^2 - \frac{1}{16}b^2$ = किती?

(1) $\left(3a - \frac{1}{4}b\right)\left(3a - \frac{1}{4}b\right)$

(2) $\left(3a + \frac{1}{4}b\right)\left(3a - \frac{1}{4}b\right)$

(3) $(3a + 4b)(3a - 4b)$

(4) $\left(9a + \frac{1}{4}b\right)\left(9a - \frac{1}{4}b\right)$

**51.** $\frac{4x + 10}{5} = 6$ तर $x$ = किती?

(1) 2 (2) 10
(3) 4 (4) 5

**52.** एका संख्येच्या तिपटीत त्याच संख्येची दुप्पट मिळविली तर 85 येते तर ती संख्या कोणती?

(1) 23 (2) 17
(3) 27 (4) 29

**53.** 1 पासून 100 पर्यंतच्या सर्व विषम संख्यांची बेरीज किती?

(1) 1600 (2) 1800
(3) 2401 (4) 2500

**54.** सर्वात लहान नैसर्गिक संख्या व सर्वात मोठी ऋण पूर्णांक संख्या यांच्यातील फरक किती?

(1) 0 (2) 1
(3) 2 (4) 4


**कच्च्या कामासाठी फक्त**

**55.** $\frac{73}{99} = ?$

(1) $0.\overline{73}$ (2) $0.\overline{731}$

(3) 0.7373 (4) 0.73473

**56.** Observe the number line and select which of the following option denotes co-ordinate of point P on the number line?




(1) $\frac{8}{3}$ (2) $\frac{7}{3}$

(3) $\frac{-10}{3}$ (4) $\frac{9}{3}$

**57.** The divisibility test of which of the following option is applicable for all the numbers 784, 98, 196, 392

(1) 2 and 7 (2) 2, 3 and 7

(3) 2, 3, 6 (4) 3, 4 and 7

**58.** Find the square root of

$\sqrt{1^3 + 2^3 + 3^3 + 4^3 + 5^3 + 6^3 + 7^3 + 8^3} =$

(1) 33 (2) 34

(3) 36 (4) 38

**59.** L.C.M. of two consecutive odd natural numbers is 2499. Which is the smaller number in those two numbers?

(1) 39 (2) 49

(3) 51 (4) 41


**SPACE FOR ROUGH WORK**

**55.** $\frac{73}{99}$ = किती ?

(1) $0.\overline{73}$ (2) $0.\overline{731}$

(3) 0.7373 (4) 0.73473

**56.** संख्यारेषेचे निरीक्षण करून P कोणती संख्या दर्शविते? पर्याय निवडा.




(1) $\frac{8}{3}$ (2) $\frac{7}{3}$

(3) $\frac{-10}{3}$ (4) $\frac{9}{3}$

**57.** 784, 98, 196, 392 या सर्व संख्यांना खालील पर्यायापैकी कोणत्या संख्यांच्या विभाज्यतेच्या कसोट्या लागू पडतील?

(1) 2 व 7 (2) 2, 3 व 7

(3) 2, 3, 6 (4) 3, 4 व 7

**58.** वर्गमूळ काढा.

$\sqrt{1^3+2^3+3^3+4^3+5^3+6^3+7^3+8^3}$ = किती ?

(1) 33 (2) 34

(3) 36 (4) 38

**59.** दोन क्रमवार विषम नैसर्गिक संख्यांचा ल.सा.वि. 2499 आहे. तर त्या दोन संख्यापैकी लहान संख्या कोणती?

(1) 39 (2) 49

(3) 51 (4) 41

<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>

**60.** Which is the greatest Rational number from the given numbers.

$\frac{16}{27}, \frac{5}{9}, \frac{2}{3}, \frac{125}{243}$

(1) $\frac{125}{243}$ (2) $\frac{16}{27}$

(3) $\frac{5}{9}$ (4) $\frac{2}{3}$

**61.** $\frac{(2^5)^3}{2^7 \times 4^2} = ?$

(1) 8 (2) 12

(3) 16 (4) 32

**62.** Sunil and Anil invested ₹ 91,000 and ₹ 65000 respectively and started a business. At the end of the year they made a profit of ₹ 48300. How much is Sunil's share in profit?

(1) ₹ 29750 (2) ₹ 28175

(3) ₹ 28375 (4) ₹ 20175

**63.** 56 workers complete a work in 60 days. To complete the same work in 42 days, how many more workers are required?

(1) 80 (2) 48

(3) 36 (4) 24

**64.** Prakash completes one work in 10 days. Prasad completes the same work in 15 days. How many days will be required to complete the same work if both of them work together?

(1) 6 (2) 5

(3) 8 (4) 9

**SPACE FOR ROUGH WORK**

**60.** $\frac{16}{27}$, $\frac{5}{9}$, $\frac{2}{3}$, $\frac{125}{243}$ यापैकी सर्वात मोठी परिमेय संख्या कोणती?

(1) $\frac{125}{243}$ (2) $\frac{16}{27}$

(3) $\frac{5}{9}$ (4) $\frac{2}{3}$

**61.** $\frac{(2^5)^3}{2^7 \times 4^2}$ = किती ?

(1) 8 (2) 12

(3) 16 (4) 32

**62.** सुनिल व अनिल यांनी अनुक्रमे ₹ 91000 आणि ₹ 65000 गुंतवून एक व्यवसाय सुरू केला. वर्षाअखेरीस त्यांना ₹ 48300 नफा झाला तर सुनिलचा नफ्याचा वाटा किती?

(1) ₹ 29750 (2) ₹ 28175

(3) ₹ 28375 (4) ₹ 20175

**63.** 56 मजूर एक काम 60 दिवसात पूर्ण करतात तेच काम 42 दिवसात पूर्ण करावयाचे असेल तर किती जादा मजूर लावावे लागतील?

(1) 80 (2) 48

(3) 36 (4) 24

**64.** प्रकाश एक काम 10 दिवसात पूर्ण करतो, प्रसाद तेच काम 15 दिवसात पूर्ण करतो तर दोघे मिळून ते काम किती दिवसात पूर्ण करतील?

(1) 6 (2) 5

(3) 8 (4) 9

**कच्च्या कामासाठी फक्त**


**65.** The sale of Vegetable seller for a week from Monday to Sunday is as follows:-
₹ 3025, ₹ 3075, ₹ 3250, ₹ 3300, ₹ 2400, ₹ 2250 and $x$.
If the average of the sale is ₹ 2800 then what is the value of ($x$), the sale on Sunday?

(1) 2000 ₹ (2) 2200 ₹
(3) 2300 ₹ (4) 2400 ₹

**66.** If m∠P = 55° then what is the measure of the supplementary angle of complementary angle of ∠P ?

(1) 35° (2) 145°
(3) 135° (4) 125°

**67.** In the adjoining figure out of ∠a, ∠b, ∠c, ∠d which angle is different?




(1) ∠a (2) ∠b
(3) ∠c (4) ∠d

**68.** Which of the following is a False statement?

(1) The angle bisectors of a triangle are not concurrent.
(2) The perpendicular bisectors of a triangle are concurrent.
(3) The sum of the measures of three angles of a triangle is 180°.
(4) In a triangle the sum of the length of the two smaller sides is greater than the length of the greatest side.

**SPACE FOR ROUGH WORK**


**65.** एका भाजी विक्रेत्याने सोमवार ते रविवार या एका आठवड्यात विकलेल्या भाजीची विक्री रक्कम पुढीलप्रमाणे दिलेल्या आहेत. 3025 रु. 3075 रु., 3250 रु., 3300 रु., 2400 रु., 2250 रु. आणि $x$ रु. जर त्यांची सरासरी विक्री 2800 रुपये असेल तर रविवारी विकलेल्या ($x$) रु. भाजीची विक्री किती रुपये असेल?

(1) 2000 रु.
(2) 2200 रु.
(3) 2300 रु.
(4) 2400 रु.

**66.** जर $\angle P = 55^\circ$ तर $\angle P$ च्या कोटीकोनाच्या पूरक कोनाचे माप किती?

(1) $35^\circ$
(2) $145^\circ$
(3) $135^\circ$
(4) $125^\circ$

**67.** सोबतच्या आकृतीमध्ये $\angle a, \angle b, \angle c, \angle d$ यापैकी कोणता कोन वेगळा आहे? ते पर्यायातून निवडा.





(1) $\angle a$
(2) $\angle b$
(3) $\angle c$
(4) $\angle d$

**68.** पुढील विधानांपैकी असत्य विधान कोणते?

(1) त्रिकोणाचे कोनदुभाजक एकसंपाती नसतात.
(2) त्रिकोणाच्या बाजूंचे लंबदुभाजक एकसंपाती असतात.
(3) त्रिकोणात तीन कोनांच्या मापांची बेरीज $180^\circ$ असते.
(4) त्रिकोण काढताना त्रिकोणाच्या मोठ्या बाजूच्या लांबीपेक्षा उरलेल्या दोन बाजूंची लांबीची बेरीज जास्त असते.

| कच्च्या कामासाठी फक्त |
| --- |
| |

**69.** What is the perimeter of the △ PQR ?





(1) 29 cm.
(2) 41 cm.
(3) 68 cm.
(4) 70 cm.

**70.** Select the option which is not the Pythagorean triplet?
(1) 42, 56, 70
(2) 15, 36, 40
(3) 10, 24, 26
(4) 11, 60, 61

**71.** The length of the rectangle is 30 cm. and breadth is 20 cm. What is the area of the square whose perimeter is same as the perimeter of the given rectangle?
(1) 625 sq.cm.
(2) 600 sq.cm.
(3) 576 sq.cm.
(4) 529 sq.cm.

**SPACE FOR ROUGH WORK**

**69.** सोबतच्या आकृतीचे निरीक्षण करून $\triangle$ PQR ची परिमिती किती?




(1) 29 सेमी.

(2) 41 सेमी.

(3) 68 सेमी.

(4) 70 सेमी.

**70.** पुढील पर्यायांपैकी पायथागोरसचे त्रिकुट नसणारा पर्याय कोणता ते निवडा :

(1) 42, 56, 70

(2) 15, 36, 40

(3) 10, 24, 26

(4) 11, 60, 61

**71.** 30 सेमी. लांबी व 20 सेमी. रूंदी असणाऱ्या एका आयताची जेवढी परिमिती आहे. तेवढीच परिमिती असणाऱ्या चौरसाचे क्षेत्रफळ किती?

(1) 625 चौसेमी.


(2) 600 चौसेमी.

(3) 576 चौसेमी.

(4) 529 चौसेमी.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**72.** In the given figure, If the area of square PQRS is 900 sq.cm. then what is the area of square ABCD formed by joining the midpoints of sides of □PQRS ?




(1) 400 sq.cm.  (2) 900 sq.cm.
(3) 450 sq.cm.  (4) 600 sq.cm.


**73.** If a cuboid has 6 surfaces, 8 vertices then it has how many edges?

(1) 12  (2) 14
(3) 10  (4) 13

**74.** Select the odd term.

(1) Cube  (2) Square
(3) Cuboid  (4) Prism


**75.** Observe the figure, two parallel lines are intersected by a transversal find $\angle a$ = ?




(1) $45^\circ$  (2) $50^\circ$
(3) $65^\circ$  (4) $55^\circ$

**SPACE FOR ROUGH WORK**

72. सोबतच्या आकृतीत चौरस PQRS चे क्षेत्रफळ 900 चौसेमी आहे. तर चौरस PQRS च्या बाजूच्या मध्यबिंदूना जोडून तयार होणाऱ्या चौरस ABCD चे क्षेत्रफळ किती?




(1) 400 चौसेमी. (2) 900 चौसेमी.
(3) 450 चौसेमी. (4) 600 चौसेमी.


73. एका चौकोनी चितीला 6 पृष्ठे, 8 शिरोबिंदू आहेत तर कडांची संख्या किती?

(1) 12 (2) 14
(3) 10 (4) 13

74. गटात न बसणारा पर्याय कोणता?

(1) घन (2) चौरस
(3) इष्टिकाचिती (4) त्रिकोणचिती

75. सोबतच्या आकृतीत दोन समांतर रेषांना एका रेषेने छेदलेले आहे त्यावरून $\angle a$ = किती ?




(1) $45^\circ$ (2) $50^\circ$
(3) $65^\circ$ (4) $55^\circ$

कच्च्या कामासाठी फक्त

**कच्च्या कामासाठी फक्त**